गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ८९ वा ● शनिवार १७ ऑगस्ट २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 89 | Date : 17/08/2024 | blow Saturday |Page 4 Price 4

# विधानसभा निवडणुकांचे बिगूल; जम्मू व काश्मीरमध्ये तीन टप्पे

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नवी दिल्ली : दशकभराच्या कालखंडानंतर तसेच संविधानातील अनुच्छेद ३७० रद्द केल्यानंतर पहिल्यांदाच जम्मू-काश्मीरमधील विधानसभा निवडणुकीची शुक्रवारी केंद्रीय निवडणूक आयोगाने घोषणा केली. १८ व २५ सप्टेंबर आणि १ ऑक्टोबर अशा तीन टप्प्यांमध्ये मतदान होणार आहे.




या केंद्रशासित प्रदेशाच्या अखेरच्या टप्प्याबरोबरच हरियाणामध्येही विधानसभा निवडणुकीसाठी मतदान होईल. दोन्ही प्रदेशांतील मतमोजणी ४ ऑक्टोबर रोजी होईल, अशी माहिती केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिली. जम्मू-काश्मीरमध्ये मतदारसंघांची फेररचना करण्यात आली असून नव्या रचनेमुळे सात जागांची भर पडली आहे. सहा जागा जम्मू विभागामध्ये तर एक जागा काश्मीर खोऱ्यामध्ये वाढवण्यात आली आहे. त्यामुळे मतदारसंघांची संख्या ८३ वरून ९० झाली आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्ये विधानसभेच्या २४ जागा असून जम्मू-काश्मीरच्या विधानसभेतील एकूण जागांची संख्या ११४ झाली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या तीन टप्प्यांमध्ये अनुक्रमे २४, २६ आणि ४० जागांवर मतदान होईल. ९० जागांपैकी ७४ जागा खुल्या प्रवर्गात तर सात जागा अनुसूचित जातींसाठी व नऊ अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये ८७.०९ लाख मतदार असून ३.७ लाख पहिल्यांदाच मतदान करतील. लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही स्थलांतरितांनाही मतदानात सहभागी होता येईल, असे आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. जम्मू-काश्मीरचा विशेषाधिकार व राज्याचा दर्जा काढून घेतल्यानंतर मे २०२४ मध्ये लोकसभेची निवडणूक घेण्यात आली होती. । पान २ वर

## सोलापूरचा स्वातंत्र्यलढा हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील ऐतिहासिक लढा : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

**⁕ हर घर तिरंगा मोहिमेतून राष्ट्रीय भावना जागृत ठेवण्याचे कार्य ⁕ जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण संपन्न**



**⁕मान्यवरांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण–**

१. जिल्हाधिकारी कार्यालय : उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्रमांक तीन सोलापूर श्री संतोष कुमार व्यंकटराव देशमुख यांना उत्कृष्ट उपजिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना शाखा श्रीमती जयश्री पंच उत्कृष्ट नायब तहसीलदार, आस्थापना शाखा लक्ष्मीकांत आयगोळे उत्कृष्ट अव्वल कारकून, महसूल शाखा अविनाश स्वामी उत्कृष्ट महसूल सहाय्यक, महसूल शाखा गणेश जगताप उत्कृष्ट शिपाई यांना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

२. पोलीस आयुक्त कार्यालय : नक्षलग्रस्त जिल्ह्यामध्ये उल्लेखनीय काम केल्याबद्दल विशेष सेवा पदक सहाय्यक पोलीस निरीक्षक नानासाहेब बाळू सावंत व पोलीस उपनिरीक्षक नागेश आप्पासाहेब येणपे यांना तर पोलीस दलामध्ये उत्कृष्ट सेवा केल्याबद्दल श्रेणी पोलीस उपनिरीक्षक सुनील हांडे यांना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद पोलीस आयुक्त एम राजकुमार व पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या हस्ते पदक प्रदान करण्यात आले.

३.जिल्हा व्यवसाय प्रशिक्षण अधिकारी कार्यालयाचे मुख्य लिपिक शाम सुरवसे यांना लेखाविषयक महत्त्वपूर्ण कामकाज केल्याबद्दल उत्कृष्ट मुख्य लिपिक म्हणून जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास हा सोलापूर जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढ्याचा उल्लेख केल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. ब्रिटिशांच्या १५० वर्षाच्या राजवटीत मार्शल लॉ ची अंमलबजावणी झालेले एकमेव शहर सोलापूर होते. त्यामुळे सोलापूरचा स्वातंत्र्यलढा हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील एक ऐतिहासिक लढा होता, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. भारताचा ७८ व स्वातंत्र्य दिन निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात मुख्य शासकीय ध्वजारोहण जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद त्यांच्या हस्ते संपन्न झाले, त्याप्रसंगी ते मार्गदर्शन करत होते.

यावेळी खासदार प्रणिती शिंदे, सोलापूर महापालिका आयुक्त शितल उगले-तेली, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, वैशपांयन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ. संजीव ठाकूर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, तहसीलदार श्रीकांत पाटील यांच्यासह सर्व विभाग प्रमुख तसेच अन्य अधिकारी कर्मचारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.। पान २ वर

## शिक्षकांनी शाळा महाविद्यालयातून भितीपत्रके साकारावीत : शांभवी कल्याणशेट्टी

### कल्याणशेट्टी महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त भित्तिपत्रकाचे प्रकाशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल मधील युट्युब, व्हाट्सअप, फेसबुक ही ज्ञान स्तोत्रे झाली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे लेखन कौशल्याकडे दुर्लक्ष झाले आहे. म्हणून शिक्षकांनी शाळा महाविद्यालयातून भित्तिपत्रके साकारावीत असे प्रतिपादन शांभवी कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसवा कल्याणशेट्टी महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त सामाजिक शास्त्रे, वाणिज्य व विज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या भित्तिपत्रकाचे प्रकाशन केल्यानंतर त्या बोलत होत्या.

यावेळी ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, साहित्यिक मुकुंद पत्की, पुनम कोकळगी, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी,बापूजी निंबाळकर, खंडेराव घाटगे उपस्थित



**कल्याणशेट्टी महाविद्यालयातील सामाजिक शास्त्रे विभागाच्या वतीने विवेक भित्तिपत्रक, विज्ञान विभागाचे अग्निपंख तर वाणिज्य विभागाचे अर्थ मंथन या भितीपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या भितीपत्रकाचे संपादक प्रा भीम सोनकांबळे, प्रा मनीषा शिंदे, प्रा शितल फुटाणे यांनी विशेष परिश्रम घेतले.**

होते. साहित्यिक मुकुंद पत्की म्हणाले की, विद्यार्थ्यांकडे अंगभूत कौशल्य असतात. त्यांचा विकास करण्याची संधी महाविद्यालयात मिळत असते. म्हणून विद्यार्थ्यांनी देखील महाविद्यालयाच्या उपक्रमात सहभाग घेऊन स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास केला पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा भीम सोनकांबळे यांनी केले.

आभार मनीषा शिंदे यांनी मानले. कार्यक्रमास डॉ बाळासाहेब पाटील, प्रा राजेश पवार, डॉ शितल भस्मे, प्रा तुकाराम शिंदे, प्रा शितल धूमशेट्टी, प्रा विद्याश्री वाले, प्रा विद्या बिराजदार, प्रा जनाबाई चौधरी, प्रा शितल फुटाणे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

## अनंत चैतन्य प्रशाला, हन्नूर येथे ७८ वा भारतीय स्वातंत्र्य दिवस विविध साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः ब्रिटिशांच्या जुलमी, मनमानी कारभाराला झुगारून स्वतः चे अस्तित्व टिकवून ठेवावयाचे असेल तर स्वातंत्र्य हवा या एकाच भावनेतून शक्ती, भक्ती व आपापल्या युक्ती ने योगदान देऊन देशाला स्वातंत्र्य



मिळवून देणाऱ्या भारतीयांच्या त्यागाचा, बलिदानाचा ,स्थैर्य,धैर्य,सत्य,गतिमानता,हरितक्रांतीचा प्रतीक असलेल्या तिरंगा ध्वज फडकवून हा स्वातंत्र्य पर्व अतिशय उत्साही वातावरणात संपूर्ण भारतभर साजरा केला जातो. त्याच अनुषंगाने आज महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय व सेमी इंग्लिश प्राथमिक शाळा,हन्नूर येथे विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला. प्रारंभी हन्नूर गावच्या ग्रामपंचायत सदस्या सौ. शांताबाई परमेश्र्वर फसगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर प्रशालेच्या विद्यार्थिनींनी स्वागत गीताने उपस्थित सर्व मान्यवरांचे स्वागत केले.यानंतर कु. शिवानी बाळशंकर हिने व कु. भाग्यश्री पाटील, सायली पवार, सिफा बागवान या मुलींनी तसेच सेमी इंग्लिशच्या चिमुकल्यांनी देशभक्तीपर गीतावर अतिशय सुंदर नृत्य सादर केले. यानंतर प्रशालेच्या, सेमी इंग्रजी व जि. प. प्राथमिक मराठी केंद्र शाळा, हन्नूर च्या मुलां- मुलींची सुरेख भाषणे झाली.यानंतर या सर्व भाषणातील विद्यार्थ्यांना मेजर राजेंद्र मल्लप्पा भरमशेट्टी यांनी तर नृत्य सादर केलेल्यांना हन्नूरचे । पान २ वर

## पत्रकार संवाद यात्रेमुळे राज्यात पत्रकारांचा संवाद पूल साधला

### सदाभाऊ खोत ह्यांचे कौतुकोद्गार; वसंत मुंडे चळवळीतील हाडाचा कार्यकर्ता

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

बत्तीस शिराळा : ''पत्रकार संवाद यात्रेच्या माध्यमातून राज्यामध्ये पत्रकारांचा संवाद पूल बांधला गेला आहे,'' असे कौतुकोद्गार माजी मंत्री व लढवय्ये आमदार सदाभाऊ खोत ह्यांनी आज काढले. ह्या यात्रेचे सूत्रधार व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे ह्यांचे त्यांनी भरभरून कौतुक केले.

पत्रकारांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी संघाने काढलेली दीक्षाभूमी (नागपूर) ते मंत्रालय (मुंबई) पत्रकार संवाद यात्रा आज दक्षिण महाराष्ट्रात पोहोचली. संघाचे पदाधिकारी व यात्रेत सहभागी झालेले सर्व पत्रकार ह्यांचे बत्तीस शिराळा (जि. सांगली) येथे श्री. खोत ह्यांनी स्वागत केले. यात्रेसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

शेतकरी-शेतमजूर ह्यांच्या प्रश्नांसाठी आम्ही काढलेल्या यात्रांची तुमच्या यात्रेमुळे आठवण झाली, असे सांगून श्री.



खोत म्हणाले, ''एवढ्या मोठ्या पल्ल्याची ही महाराष्ट्रातील पहिलीच यात्रा असावी. या माध्यमातून राज्यातील पत्रकारांमध्ये संवादाचा पूल बांधला गेला, हे मला तिचे सर्वांत मोठे यश वाटते. ही एक चळवळ आहे. ह्या चळवळीचा पुढचा प्रवास अशा पुलामुळे सहज आणि सोपा होतो. वसंत मुंडे ह्यांच्यासारख्या हाडाच्या कार्यकर्त्यांबरोबर राज्यातील पत्रकारांनी राहावं, त्यांना साथ द्यावी, असं मी नक्कीच सांगीन.''

पत्रकार म्हणजे गावगाड्यातील हेरच होत. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या काळातही हेरखाते होते. बहिर्जी नाईक आणि त्यांचे सहकारी हे काम करीत. हेरमंडळी राज्याचे डोळे असतात. राज्यात काय चालले आहे, हे ते राजाला दाखवून देतात, असे सांगून श्री. खोत म्हणाले की, अशा आधुनिक हेरखात्यावर सरकारने मायेची पाखर घालावी, मदतीचा हात द्यावा, ही माझी अपेक्षा आहे.प्रदेशाध्यक्ष मुंडे ह्यांच्याशी पत्रकारितेच्या पलीकडचे नाते असल्याची आठवण करून देत श्री. खोत म्हणाले, ''आमचे नाते चळवळीचे, गावगाड्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरचे आहे. शरद जोशीसाहेबांच्या चळवळीच्या निमित्ताने आमचे संबंध आले. वसंतराव हाडाचा कार्यकर्ता, गावगाड्यातला कार्यकर्ता आहे.

सर्वसामान्य माणसाच्या प्रश्नाची त्यांना जाण आहे. अशा चांगल्या माणसाबरोबर खऱ्या अर्थानं पत्रकारांनी राहायला पाहिजे.'' पत्रकारांना राज्य सरकारने जपले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करताना श्री. खोत म्हणाले की, कोणतीही व्यवस्था निश्र्चितच परिपूर्ण असत नाही. परंतु कमीत कमी दोष ठेवून चांगल्या व्यवस्थेकडे आपल्याला जायचे आहे. प्रत्येक व्यवस्थेमध्ये दोष असतातच. कचरा पडलेले पाणी आपण गाळून घेतो, त्याच पद्धतीने प्रत्येक व्यवस्थेमधील दोष गाळून पुढे जावे लागेल.

## अन्नदान सेवा, महाप्रसाद गृह, पार्किंगची व्यवस्था आणि येणाऱ्या भाविकांसाठी न्यासाचे पुढील मास्टर प्लॅन देखील अतिशय सुनियोजित : अतुल कुलकर्णी

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी




विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अखंडपणे सुरू असलेले अन्नदान सेवा, नियोजित महाप्रसाद गृह, पार्किंगची व्यवस्था आणि येणाऱ्या भाविकांसाठी न्यासाचे पुढील मास्टर प्लॅन देखील अतिशय सुनियोजित असल्याचे मनोगत सोलापूर ग्रामीणचे नूतन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

ते श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता, मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, चिदानंद उपद्य, पीएसआय खापरे हे उपस्थित होते. यावेळी न्यासाचे सचिव शामराव मोरे, विश्र्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, निखील पाटील, गोटू माने, प्रवीण घाडगे, । पान २ वर

## संपादकीय

### इतकी गरज आहे.

चांगला माणूस होण्यासाठी दुसरा पर्याय नाही. अवचित प्रसंगी मित्र-मैत्रिणी खचून जाऊ शकतात. तेव्हा त्यांना साथ द्या. कठीण प्रसंगात एकमेकांची साथ सोडू नका. समाजात वावरताना कान आणि डोळे नेहमी उघडे ठेवा. त्यासाठी समाजभान जागृत ठेवण्याचा सल्ला प्रसिद्ध अभिनेता सुमित राघवन यांनी दिला आहे. संवेदना, सामाजिक बांधिलकी, सहवेदना, सहचर्य, मदतीची भावना ही माणसाची काही वैशिष्ट्ये. तथापि त्यांची वीण विसविशीत होत चालल्याचे अनुभव समाज घेतो. अलीकडच्या काळात अशा घटनांमध्ये वाढ होत चालल्याचे आढळते. समाजात घडणाऱ्या अनेक अनावस्था आणि कटू प्रसंगांमध्ये अनेक लोक 'बघ्याची' भूमिका घेताना आढळतात. अपघात घडतात. त्यातील जखमी मदतीच्या प्रतीक्षेत असतात. रस्त्यावर मारामाऱ्या होतात. मुलींची छेड काढली जाते. प्रेमप्रकरणातून त्यांच्यावर हल्ल्याच्या घटना घडतात. अशा प्रसंगांमध्ये क्वचितच माणसे मदतीला धाव घेताना आढळतात. त्याऐवजी प्रसंगाचे मोबाइलवर चित्रीकरण करण्यात मात्र आघाडीवर दिसतात. सामान्य माणसे मदतीला धाव का घेत नसावीत? त्याचीही काही कारणे असू शकतील का? प्रसंग अपघाताचा असला तरी न्यायालयाच्या किंवा पोलीस स्थानकांच्या चकरा माराव्या लागतील, मारामाऱ्या सोडवायला गेले किंवा छेड काढणाऱ्यांना हटकले तर मध्यस्थी करणाऱ्यालाचे मारहाण होऊ शकेल, अशी भीती सामान्य माणसांना वाटते. तशा घटना घडल्याही आहेत. पण विरोध करायला एक जरी व्यक्ती पुढे आली तर त्याची साथ द्यायला पुढे येण्याची हिंमत माणसांमध्ये येऊ शकते, हे काही प्रसंगांनी अधोरेखित केले आहे. सामाजिक मदतीच्या गरजेची वेळ प्रत्येकावर कधी ना कधी येते. अशावेळी आजूबाजूच्या ाणसांनी मदतीसाठी धाव घ्यावी, अशी सर्वांचीच अपेक्षा असते. तथापि मदतीची सुरुवात स्वतः पासून करणे आवश्यक आहे याचा मात्र माणसांना विसर पडला असावा का? मला काय त्याचे, अशी अलिप्ततेची किंवा मदतीसंदर्भात भीतीचीच भावना प्रत्येकाच्या मनात असली तर मदतीसाठी कोण धावेल, याचाही विचार केला जाऊ शकेल का? अन्यथा मदतीला कोणीच पुढे येत नाही असा दोषारोप होतच राहील. सामाजिक वेदना जाणवण्यासाठी प्रत्येकाने चांगला माणूस होणे गरजेचे आहे, हेच राघवन यांना सुचवायचे असावे. ज्याची समाजाला कधी नव्हे इतकी गरज आहे.

# स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून इस्माईल मूर्डी यांनी गरीब कुटुंबातील दहा मुलांना दत्तक घेत शिक्षणाची जबाबदारी उचलली

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनीधी : गावाला शाळेचा आधार आणि शाळेला गावाचा अभिमान असतो असं आपण नेहमी म्हणतो. ग्रामीण भागातल्या गरीब आणि होतकरू मुलांना आधार देत त्यांना शिक्षणाचे धडे देण्याचे कार्य शिक्षक करत असतात. काही संवेदनशील मनाचे शिक्षक सामाजिक दायित्वाचे भान ठेवून गरीब आणि होतकरू मुलांच्या पंखांना बळ मिळावे म्हणून तन-मन-धनाने सहकार्य करण्यासाठी पुढे येतात.

जिल्हा परिषद प्राथमिक मराठी केंद्र शाळा हत्तीकणबस येथील सेवानिवृत्त झालेले केंद्रीय मुख्याध्यापक श्री इस्माईल मौला मुर्डी सर यांनी इतरांसाठी एक नवा आदर्श वस्तू पाठ घालून दिला.

सेवानिवृत्त झालेले असताना देखील आपला बहुमोल वेळ खर्च करत शाळेच्या विकासामध्ये योगदान देत आहेत. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून श्री इस्माईल मूर्डी सर यांनी गरीब कुटुंबातील दहा मुलांना दत्तक घेत त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी उचलली. या गरीब मुलांच्या शिक्षणाचा आर्थिक खर्च भागवण्यासाठी श्री इस्माईल मुर्डी सर यांनी मुख्याध्यापकांच्या नावे पाच हजार रुपये इतक्या रकमेचा चेक सुपूर्द केला. या दातृत्वाच्या भावनेचा समस्त गावकऱ्यांच्या वतीने सन्मान होत



आहे. इयत्ता दहावी मध्ये बोर्ड परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना श्री.मुर्डी सर यांनी प्रत्येकी पाचशे एक रुपयाचे पारितोषिक देऊन त्यांचे अभिनंदन केले.

केंद्रीय मुख्याध्यापक म्हणून शाळेची जबाबदारी पार पडत असताना गावातील सर्व पालकांना एकत्रित आणून शाळेच्या विकासामध्ये सामावून घेतले.

गावातील सर्व सदन पालक, मोठे शेतकरी, शालेय व्यवस्थापन समितीतील सर्व पदाधिकारी या सर्वांना विश्र्वासात घेत शाळेच्या भौतिक विकासात भर घातली. लोकवर्गणीतून शाळेसाठी दोन संगणक संच उपलब्ध करून घेतले. आज त्यांच्या प्रयत्नामुळे ग्रामीण भागातील गरिबांची मुले संगणकाची धडे घेत आहेत. लोकसभागातून तब्बल अडीच लाख रुपये जमा करून शाळेतील मुला मुलींसाठी स्वतंत्र शौचालय बांधता यावे यासाठी दोन गुंठे जागा खरेदी केली. आज शाळेत मुला मुलींसाठी स्वतंत्र शौचालयाची दोन युनिट उपलब्ध झालेले आहेत. या सर्व कार्यामध्ये गावातील सन्माननीय सरपंच श्री. श्रीशैल माळी साहेब, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री देवेंद्र बिराजदार, उपाध्यक्ष श्री. पंचप्पा घोडके, सर्व शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, माझी तंटामुक्त अध्यक्ष श्री बसवराज माणिक बिराजदार, प्रगतशील बागायतदार शेतकरी श्री. सिद्रामप्पा दोड्याळे मामा आणि गावातील असंख्य पालक, शिक्षण प्रेमी यांचे सहकार्य लाभले. काल स्वातंत्र्य दिनाचा उत्सव सोहळा साजरा करत असताना गावातील उपस्थित सर्व पालक सरपंच, उपसरपंच, शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य या सर्वांनी श्री इस्माईल मुर्डी सर यांचे मनापासून अभिनंदन केले.

अक्कलकोट तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी श्री प्रशांत अरबाळे साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी श्री सोमशेखर स्वामी साहेब, हत्तीकणबस केंद्राचे केंद्रप्रमुख श्री सुरेश शटगार साहेब या सर्वांनी श्री. मुर्डी सर यांचे कौतुक केले. इतरांनीही मुर्डी सरांचा आदर्श घ्यावा अशी भावना या सर्वांनी व्यक्त केली..

# दुधनी जिल्हा परिषद प्रा.केंद्र शाळा येथे ७८ वा स्वातंतत्र्यदिन जल्लोषात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः दुधनी येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी,कन्नड मुली, कन्नड मुले व उर्दू शाळा या चारही शाळेच्या संयुक्त विद्यमाने भारतीय स्वातंत्र्याचा७८ वा स्वातंत्र्य दिन अगदी जल्लोषात साजरा करण्यात आला.

प्रथमत: मराठी शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. गोरखनाथ धोडमनी आणि कन्नड मुले शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री संतोष गुरुभेट्टीआणि उर्दू शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष युसुफ जिडगे यांच्या हस्ते महात्मा गांधीजी आणि घटना समितीचे शिल्पकार बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ध्वजारोहण कन्नड मुली शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ.सुहासिनी गद्दी यांच्या हस्ते करण्यात आले. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून अनेक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते प्रत्येक शाळेतील मुला- मुलींनी देशभक्तीपर नृत्य



सादर केले व अनेक विद्यार्थी यांचे भाषण झाले, विद्यार्थ्यांचे कलागुण पाहून मराठी शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री हणमंत कलशेट्टी,शिक्षण तज्ञ श्री सैदप्पा झळकी, सदस्य श्री मिहिदमिया जिडगे, व श्री शांतलिंग कोगनुर कन्नड मुली शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्रीमंतप्पा परमशेट्टी सौ.दीपिका बंद्राड,सौ लक्ष्मी काळे श्री हकीम चौधरी गंगावती मॅडम या प्रमुख उपस्थिती मान्यवरांकडून मुलांना बक्षिसे देऊन प्रतिसाद दिला यावेळी चारही शाळेतील शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य व श्री श्रीशैल मलगण,श्री शिवचलप्पा बाबा, श्री दत्तात्रय टोणगे, श्री महेबुब कोरबू चारही शाळेतील शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते. सुत्रसंचालन श्री सिध्दाराम चौधरी तर आभार श्री संतोष जोगदे यांनी मानले.

पान १ वरुन

### विधानसभा निवडणुकांचे बिगूल..

या निवडणुकीमध्ये गेल्या ४० वर्षांतील सर्वाधिक मतदान नोंदवले गेले होते. 'काश्मीरमधील जनतेने बंदुकांपेक्षा मतदानाला अधिक महत्त्व दिले. लोकांनी उत्स्फूर्तपणे मतदान केले, मतदानासाठी रांगा लागल्या होत्या. काश्मिरी लोकांनी लोकशाहीवरील विश्र्वास दृढ केला. विधानसभा निवडणुकीतही लोकशाहीच्या उत्सवात काश्मिरी जनता मोठ्या प्रमाणावर सहभागी होईल', अशी आशा निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी व्यक्त केली. जम्मू-काश्मीरमध्ये ३० सप्टेंबरपर्यंत विधानसभा निवडणूक घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयोगाला दिला होता. त्यानुसार आयोगाने केंद्रशासित प्रदेशाचा दौरा करून कायदा-सुव्यवस्थेची पाहणी केली होती. त्यानंतर आयोगाने केंद्रीय गृह मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा केली होती. त्यानंतर आयोगाने शुक्रवारी जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या. गेल्या काही महिन्यांमध्ये प्रामुख्याने जम्मू विभागामध्ये दहशतवादी हल्ले झाले आहेत. यापूर्वी २०१४ मध्ये जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभेची निवडणूक झाली होती. कुठल्याही पक्षाला बहुमत न मिळाल्याने आश्र्चर्यकारक निर्णयात भाजपने मुफ्ती महम्मद सईद यांच्या 'पीडीपी'शी युती करून संयुक्त सरकार स्थापन केले होते. मात्र मे २०१८ मध्ये भाजपने सरकारचा पाठिंबा काढून घेतला होता. त्यानंतर जम्मू-काश्मीरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली.

### अनंत चैतन्य प्रशाला, हन्नूर..

उपसरपंच व युवा नेते मा. सागरदादा कल्याणशेट्टी यांनी रोख पारितोषिक देऊन गौरवले.यावेळी माध्यमिक व उच्च शालांत प्रमाणपत्र परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक व इ. ५ वी ते ९ वी त प्रथम व शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना कल्याणशेट्टी, मुल्ला, पत्की, बिराजदार, कलबुर्गी, जकीकोरे, पाटील,सैदे, हताळे कुटुंबियांकडून ठेवण्यात आलेले रोख पारितोषिके देऊन गौरवण्यात आले.या सर्व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे माजी प्राचार्य व मार्गदर्शक आदरणीय श्री. सिद्धेश्र्वर कल्याणशेट्टी सर होते. याप्रसंगी गावातील विविध मान्यवर,ग्रामपंचायत सदस्य,ग्रामविस्तारअधिकारी थोरात, तंटामुक्त अध्यक्ष,माजी उपसरपंच,जेष्ठ नागरिक, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, आशावर्कर्स, अंगणवाडी सेविका,जि.प.शाळेचे मुख्याध्यापक श्री.श्रीकांत राठोड व शिक्षकवृंद,प्रशालेचे माजी मुख्याध्यापक श्री.चंद्रकांत व्हनमाने,श्री.अशोक दंतकाळे,श्री.विलास बिराजदार, सेवानिवृत्त शिक्षक श्री. विश्र्वनाथ चव्हाण, श्री. निंगप्पा बिराजदार, सेवानिवृत्त वरिष्ठ लिपिक श्री. विलास तळवार, कनिष्ठ लिपिक श्री. अब्दुलकरीम मुल्ला, प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. अशोक साखरे, पर्यवेक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. अप्पासाहेब काळे,ज्युनियर विभाग प्रमुख प्रा. रविंद्र कालीबत्ते,सेमीविभाग प्रमुख श्री. शशिकांत अंकलगे,संगीतशिक्षक सुरेश जाधव,कलाशिक्षक राजेंद्र यंदे तसेच माध्यमिक, उच्च माध्यमिक,सेमी चे समस्त शिक्षक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन सौ. मल्लमा चप्पळगाव यांनी केले तर आभार सौ. स्वप्नाली जमदाडे यांनी मानले.

### अन्नदान सेवा, महाप्रसाद गृह,..

एस.के.स्वामी, सिध्दाराम कल्याणी, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, अभियंता अमित थोरात, बाळासाहेब पोळ, सुरज सावंत, दत्ता माने, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

### सोलापूरचा स्वातंत्र्यलढा हा भारतीय

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, भारताच्या स्वातंत्र्याचे आणि अखंडतेचे प्रतीक म्हणजे आपला राष्ट्रध्वज. आपल्या देशाचा तिरंगा हा प्रत्येक भारतीयाचा अभिमान आहे, त्याबद्दल प्रत्येकाच्या मनात आदर आहे. हर घर तिरंगा मोहिमेतून राष्ट्रीय भावना जागृत ठेवण्याचे कार्य केले जात आहे. ही मोहीम संपूर्ण देशासह सोलापूर जिल्ह्यात ही अत्यंत प्रभावीपणे राबवली जात आहे, असे त्यांनी सांगितले.

विकासाच्या दिशेने वाटचाल करणारा आपला सोलापूर जिल्हा उद्योग, कृषी, शैक्षणिक, आरोग्य, संस्कृती, पर्यटन या क्षेत्रात चांगली प्रगती करत आहे

सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन ही सर्व प्रकारचे सहकार्य करत आहे. प्रशासन ही सर्व शासकीय योजनांची जिल्ह्यात प्रभावीपणे अंमलबजावणी करून शेवटच्या घटकापर्यंत योजना पोहोचतील यासाठी प्रयत्नशील असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.प्रारंभी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांच्या हस्ते

भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण संपन्न झाले. त्यानंतर राष्ट्रगीत व राज्य गीत गायन झाले. या समारंभास उपस्थित असलेले ज्येष्ठ स्वातंत्र्य, सैनिक ज्येष्ठ नागरिक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, पालक, पत्रकार त्यांची सदिच्छा भेट घेऊन सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या मनपूर्वक शुभेच्छा दिल्या.

यावेळी राष्ट्राचा अभिमान असलेला राष्ट्रध्वज तिरंगा ची सर्व मान्यवरांनी शपथ घेतली.

# प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्यार्थांना दप्तर वाटप

अक्कलकोट/प्रतिनिधीः जेऊरवाडी(ता अक्कलकोट)प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेतील विद्यार्थांना कै.वालु रामू राठोड यांच्या स्मरणार्थ,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीदेवी राठोड व नामदेव राठोड यांच्या वतिने दप्तर वाटप करण्यात आले. गरजू मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून प्रोत्साहन देण्यासाठी नामदेव राठोड यांनी विद्यार्थ्यांना शालेय दप्तर देऊन समाजात एक आदर्श उभी केली असून आगामी काळात त्याकडून असेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात यावे.शिक्षणासाठी चळवळ त्यांचा व मानस असल्याचे तंटामुक्त अध्यक्ष श्रीमंत राठोड यांनी सांगितले. यावेळी सरपंच कमळाबाई राठोड,उपसरपंच वृषाली भालेराव,ग्रा.पं.सदस्य रोहित भालेराव,सीताबाई चव्हाण,माजी सरपंच नंदराम चव्हाण,संजय




जाधव,प्रकाश चव्हाण,रवी पवार,अक्षय राठोड,अंगणवाडी सेविका,मतदनीस शिक्षक त्रिभुवन जाधव,प्रिया घाडगे व ग्रामस्थ उपस्थित होते.

# मेरा बुद्रुक येथील तरूणपणात मुलाच्या आत्महत्येने आई-वडील हतबल!

बुलढाणा/राहुल साबळे ::। तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात व्यसनाच्या आहारी जाऊन भरकटत चालला आहे.त्यामुळे सर्व आई-वडिलाकरता व समाजाकरिता ही बाब चिंतेची असून ज्या मुलांना आई-वडिलांनी लहानपणापासून आपल्या मुलाकडे लक्ष देण्याची सुद्धा गरज निर्माण झाली आहे आज रोजी प्रत्येक गावामध्ये २० ते ३० वयोगटातील नवतरुण व्यसनाच्या आहारी गेली आहे. आपल्या डोळ्यात देखत ज्याला आपण लहान चे मोठे केले शिक्षण दिले तोच तरुण व्यसनाधीन होऊन आपला जीव गमावत असताना आई-वडिलांना किती दुःख होत असेल याची कल्पना न केलेली बरी,मेरा बुद्रुक येथील पंधरा दिवसांमध्येदोन ते तिन तरुण व्यसनाधीन होऊन मृत्युमुखी पडले आहे,या तरुणांचे लग्न सुद्धा झालेले नव्हते.ज्या तरुणांनी आई-वडिलांना म्हातारपणामध्ये सांभाळ केला पाहिजे तेच तरुण आज व्यसनाच्या आहारी जाऊन मृत्यूच्या धाडे मध्ये जात आहे आपल्या डोळ्या देखत तरुण मुलाचा मृत्यू बघून आई-वडिलांना तीव्र वेदना होत असतीलच याची जाणीव व्यसनाच्या आहारी गेलेल्या तरुणांना व्हायला हवी त्यामुळे आपल्या डोळ्यात देखत आपल्याच मुलाला खांदा देण्याची वेळ आई-वडिलावर तरुणांनी येऊ देऊ नये एवढीच अपेक्षा मेरा बुद्रुक मधील सर्व आई-वडील करीत आहे.सध्या मेरा बुद्रुक मध्ये तीस वर्षाच्या आतील नवतरुण आत्महत्या करत असल्याने अनेक आई-वडील हातबल झाल्याचे दिसून येत आहे. नैराश्य,व्यसन या कारणामुळे तीस वर्षाच्या आतील तरुण मुले आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलत आहे.मेरा बुद्रुक मध्ये सध्या स्थिती पाहता वरली मटका व देशी दारूच्या आहारी गेलेले आणि तरुण असून, वरली मटका खेळण्यासाठी अनेक लोकांनी आपल्या घरातील पीठ सुद्धा विकल्याचे समोर आल्या आहे.वरली,दारू पिण्यासाठी अनेक नवतरुण आपल्या घरातील



दाळ,पीठ विकण्याचे धाडस करत असून आई-वडील मोलमजुरी करून संसाराचा गाडा चालवत असतानाच आपला मुलगा एवढा व्यसनाधीन किंवा देशी दारू वरली च्या अधीन झाल्याने आई-वडिल हातबल होत असताना दिसून येत आहे. व्यसनाधीन एखाद्याचा मृत्यू झाल्यास समशानभूमीमध्ये अनेक नेतेमंडळी दहा दहा मिनिटांचे भावपूर्ण श्रद्धांजली वर भाषण ठोकतात पण ह्या नवतरुणांना समजून सांगण्याचे धाडस कोणी करत नसल्याचे सध्यातरी दिसून येत आहे.ह्या व्यसनाधीन झालेल्या किंवा वरली मटका खेळत असलेले तरूण घरातील दाळ,पीठ विकून वरली आणि देशी दारू पिऊन आई-वडिलांना मारहाण करण्याचे अनेक प्रकरणे समोर येत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# डिजीटल क्रांतीवर स्वार होण्यासाठी युवकांनी सज्ज राहावे : ॲड.आकांक्षाताई चौगुले

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

उमरगा/प्रतिनिधी : जगामध्ये होत असलेल्या डिजीटल क्रांतीवर स्वार होण्यासाठी युवकांनी सज्ज राहीले पाहीजे. यापासुन आपल्याला आर्थिक व सामाजीक विकास घडवुन आणता येतो. महाराष्ट्र शासनाच्या वतीने गरजु युवकांसाठी संगणक कौशल्यावर आधारित अनेक अभ्यासक्रम मोफत स्वरूपात




राबवले जातात. शासनाने युवकांच्या भविष्यासाठी संगणकाच्या माध्यमातुन 'सारथी' दिला आहे. याचा प्रत्येक विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन आपले करिअर घडवावे. असे मत ज्ञानज्योती सामाजीक संस्थेच्या अध्यक्षा ॲड. आकांक्षाताई चौगुले यांनी शुक्रवार दि. १६ रोजी सायंकाळी व्यक्त केले.

मायक्रोकॉमच्या वतीने मराठा समाजासाठी असलेल्या चघउङ व सारथीच्या वतीने सुरू असलेल्या छत्रपती संभाजी महाराज सारथी डिजिटल एम्प्लॉयबिलिटी एन्हांसमेंट प्रोग्राम हा सहा महीने कालावधीचा डिप्लोमा यशस्वीरीत्या पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र वितरण सोहळा मंगळवारी (ता.१३) रोजी मायक्रोकॉम सभागृहात घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश प्रवक्त्या रेखाताई सुर्यवंशी अध्यक्षस्थानी होत्या. मायकॉमचे संचालक प्रा. युसुफ मुल्ला उपस्थित होते. मायक्रोकॉमच्या वतीने विवीध संगणक कोर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संगणकीय प्रशिक्षण योजनांचा लाभ देण्यात येत आहे. या माध्यमातून गेल्या पंचवीस वर्षापासून अनेक विद्यार्थ्यांचे जीवन घडले आहे व यापुढेही विद्यार्थ्यांनी अशा कोर्सेसच्या माध्यमातून काळाची पावले ओळखून स्वतःची प्रगती साधावी असे आवाहन जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश प्रवक्त्या रेखाताई सूर्यवंशी यांनी व्यक्त केल्या.

यावेळी सारथी व इतर कोर्सच्या यशस्वी विद्यार्थ्यांचे मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. अनिता मोरे यास मान्यवरांच्या हस्ते एमकेसील पुणेच्या वतीने इंटरनशिपसाठी ऑफर लेटर देण्यात आले.प्रा. युसुफ मुल्ला यांनी प्रास्ताविक केले. पुजा वाले सुत्रसंचलन केले. साक्षी वाघमारे यांनी आभार मानले. रमेजा मोमीन, सुमय्या जमादार, प्रदीप साळूंके, करण राठोड, करीम तांबोळी, अनुपमा पाटील, प्रज्ञा मुलगे, स्वाती मुलगे, सानिया मुजावर, मानसी नंदर्गे, प्रतिक्षा बिराजदार, श्रावणी आम्ले, आकांक्षा पाटील, पुजा माने आदींनी यासाठी पुढाकार घेतला. यावेळी विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुस्ते येथे खेळ पैठणीचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

## गप्पा, गाणी, प्रश्नमंजुषा सह हळदी-कुंकू कार्यक्रमातून अभिजीत पाटीलांची विधानसभेची जोरदार तयारी




पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री अभिजीत आबा पाटील यांच्या संकल्पनेतून विठ्ठल प्रतिष्ठान यांच्यावतीने नागपंचमी व रक्षाबंधनानिमित्त सुप्रसिद्ध निवेदिका मोनिका जाजू यांच्या निवेदनाखाली खेळ पैठणीचा कार्यक्रम सुस्ते येथे उत्साहात संपन्न झाला..

दैनंदिन जीवनात व्यस्त असलेल्या महिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा हेतुने कार्यक्रम घेत आहे. महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांनाही आनंदाचे क्षण वेचता यावेत याच अनुषंगाने खेळ पैठणीचा कार्यक्रम घेत असल्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले. सदर कार्यक्रमामध्ये विजयी झालेल्या महिलांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांना पारितोषिकांचे वाटप करण्यात आले.

यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक रामदास बापू चव्हाण, पांडुरंग कदम, बाळासाहेब सालविठ्ठल, अनिल काका घाडगे, सरपंच विशाल कसबे, दिलीप दाजी रणदिवे, समाधान चव्हाण, उपसरपंच स्नेहा बोबडे, ग्रामपंचायत सदस्य राणी चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य मनीषा कोळी, ग्रामपंचायत सदस्य विष्णू तात्या गावडे, राजेंद्र बोबडे, विठ्ठल कारखान्याचे संचालक विठ्ठल रणदिवे, परमेश्र्वर कांबळे, अजित मुलाणी, शरद लोकरे, अंनता चव्हाण, कुमार वाघमोडे, अर्चना चव्हाण, सारिका चव्हाण तसेच या कार्यक्रमासाठी अथक परिश्रम घेतलेले डीव्हीपी पीपल बँकेचे संचालक अनिल यादव, तानाजी सालविठ्ठल, शंकर सुर्वे, तुषार बोबडे, नितीन गावडे, महेश सालविठ्ठल, संतोष साठे, पंकज चव्हाण, बालाजी फुगारे, विशाल फरतडे, श्रीनिवास चव्हाण, अविनाश नागटिळक यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.

# तालुक्यातील प्रत्येक कुटुंबामध्ये विकास पोहोचण्यासाठी नोकरी महोत्सवास महत्व : माजी मंत्री हर्षवर्धन पाटील






**दैनिक यशसिद्धी न्युज**

इंदापूर/अतुल सोनकांबळे : जिजाऊ फेडरेशनच्या वतीने राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष,माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त इंदापूर येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये शुक्रवार दि.१६ ऑगस्ट रोजी भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या नोकरी महोत्सवाचे उद्घाटन माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुणे जिल्हा भाजप युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अंकिता पाटील ठाकरे , युवा नेते राजवर्धन पाटील, महाराष्ट्र राज्य टी. पी. ओ. चे अध्यक्ष डॉ. शितल कुमार रवंदळे उपस्थित होते.

रेड्डी फाऊंडेशन, बजाज ऑटो, टाटा मोटर्स, भारत गियर्स, डूथ ऑटोमेटिव्ह, क्सिस बँक, मुटूथ फायनान्स, एलआयसी, रॉयल इन्फोटेक, जिनियस कन्सल्टंट, आर३५ सिक्युरिटीज अर्णव इन्फो यासारख्या ७७कंपन्या व त्यांचे मानव संसाधन विभाग अधिकारी, सीईओ व व्यवस्थापकीय संचालक नोकरी महोत्सवामध्ये सहभागी झाले.भिगवन, बावडा , इंदापूर या ठिकाणी घेण्यात आलेल्या कॅम्पस मुलाखतीच्या माध्यमातून १२०० युवक व युवतींनी ऑनलाईन रजिस्टर करून या नोकरीत महोत्सवामध्ये सहभागी झाले होते.

डॉ. शितलकुमार रवंदळे यांची महाराष्ट्र राज्य टीपीओच्या प्रमुखपदी निवड झाल्याबद्दल माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. हर्षवर्धन पाटील म्हणाले की,' इंदापूर तालुक्यातील युवा वर्गाला रोजगार संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने जिजाऊ फेडरेशनने भव्य नोकरी महोत्सवाचे आयोजन केले आहे. अनेक युवक हुशार, गुणवंतधारक कौशल्यधिष्ठीत असतात मात्र युवकांना रोजगारासंबंधी योग्य असे व्यासपीठ ( प्लॅटफॉर्म ) मिळत नाही. जिजाऊ फेडरेशनने गरजू युवा वर्गाला ही संधी उपलब्ध करून दिली आहे.

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ इंदापूर, एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट वनगळी तसेच श्री.शिवाजी एज्युकेशन सोसायटी बावडा शैक्षणिक संकुलाच्या माध्यमातून दरवर्षी २४ ते २५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत या विद्यार्थ्यांना आपल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हावेत यासाठी अनेक कंपन्या , उद्योग , व्यवसायिक जगताशी संपर्काच्या माध्यमातून ही संधी त्यांना उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील आहोत.'

अंकिता पाटील- ठाकरे म्हणाल्या की,' जिल्हा परिषदेच्या माध्यमातून काम करताना तसेच तालुक्यामध्ये संपर्क साधताना बेरोजगाराची समस्या दिसून आली यातून मार्ग काढण्यासाठी रोजगार मिळावे महत्त्वपूर्ण ठरतील या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन केले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंदापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जीवन सरवदे यांनी केले.

यावेळी जी.आर.बी सोल्युशन पुणे चे संचालक गुरुदेव अलुरकर, नानक जाधव तसेच संस्थेचे संचालक सुरेश मेहेर , रघुनाथ राऊत , प्राचार्य डॉ. महादेव वाळुंज,प्राचार्य डॉ. लहू वावरे, उपप्राचार्य प्रा.दत्तात्रय गोळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. फिरोज शेख यांनी केले.कार्यक्रमाचे आभार इंदापूर महाविद्यालयाचे टीपीओ प्रमुख डॉ. सदाशिव उंबरदंड यांनी केले.


# मंत्रालयाचे सचिव संदेश मेळेकर यांनी जाधवर (धस) परिवाराची घेतली सदिच्छा भेट



**दैनिक यशसिद्धी न्युज**

अक्कलकोट/ प्रतिनीधी :महाराष्ट्रा राज्य मंत्रालय मुंबई येथील मंत्रालयाचे सचिव श्री संदेश मेळेकर स्वामी समर्थांच्या दर्शनाकरिता आले असता शैक्षणिक क्षेत्रातील व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय भरीव कामगिरी करत असणाऱ्या शिक्षिका श्रीमती रिंकू जाधवर धस जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा उमरगे तालुका अक्कलकोट यांची सहपरिवारासह घरी जाऊन सदिच्छा भेट घेतली .याप्रसंगी मेळेकर यांनी जाधवर (धस ) यांच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला त्यांच्या कार्याचे कौतुक करत असे सामाजिक शैक्षणिक कार्यात समाजासाठी वंचित घटकांसाठी मुलींसाठी पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपणाचा उपक्रम असेल अशा विविध उपक्रमांसाठी व शैक्षणिक क्षेत्रातील भरीव योगदानाची माहिती मिळाल्यामुळे अक्कलकोटला आले असता त्यांनी जाधवर धस कुटुंबीयांना स्वतः फोन करून त्यांच्याशी बोलून घरी जावून जाधवर मॅडम यांचा सत्कार केला .त्यांच्या सर्व उपक्रमांचे व शैक्षणिक सामाजिक कार्याचे कौतुक करून खरोखरच समाजाबद्दल अशा तळमळीने काम करणाऱ्या शिक्षकांची आज गरज आहे हे कार्य आपण असेच चालू ठेवावे असे बोलून त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या .याप्रसंगी श्री नवनाथ धस सामाजिक कार्यकर्ते तसेच सचिव साहेबांचे संपूर्ण कुटुंबीय उपस्थित होते .

# स्वेरीमध्ये ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**दैनिक यशसिद्धी न्युज**

पंढरपूर/प्रतिनिधी : गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले.

स्वेरीच्या भव्य मैदानावर अथांग पसरलेल्या हिरवळीवर चारही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत भारताचा हा ७८ वा स्वातंत्रदिन साजरा करण्यात आला. कोमल कसबे यांनी सुमधुर चालीत'ए वतन तेरे लिये...'हे 'कर्मा' चित्रपटातील गीत गायले. श्रुष्टी भोसले यांनी भारताची कालची व आजची परिस्थिती सांगून स्वातंत्र्यानंतर भारताची स्थिती यावर इंग्रजी भाषेतून आपले विचार मांडले. सुदिक्षा जगताप ह्या डिप्लोमा इंजिनिअरिंगच्या विद्यार्थिनीने अभ्यासपूर्ण भाषणात इंग्रजांनी केलेले अत्याचार, स्वातंत्र्यासाठी योगदान दिलेले शूरवीर पासून ते स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने केलेली आजपर्यंतची प्रगती यावर भाष्य केले. वैकुंठी जाधव व ओम गाढवे यांनी'स्वातंत्र्य दिनाचे महत्व सांगून युवकांचे कार्य कसे असावे यावर सर्वस्पर्शी विचार व्यक्त केले. तर अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी'स्वातंत्र्यानंतर भारतातील शैक्षणिक, राजकीय, क्रीडा, सामाजिक क्षेत्रातील प्रगती सांगून स्वेरीच्या शैक्षणिक उपक्रमातील महत्वाचे टप्पे सांगताना स्वेरी, संशोधन विभाग, सोबस,ग्रामीण मानव संसाधन विकास केंद्र (आर.एच.आर.डी.एफ.), नवीन शिक्षण प्रणाली (एनईपी २०२०), या शैक्षणिक बाबींवर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांपुढील स्पर्धात्मक आव्हाने आणि पुढील जबाबदारी' यावर प्रकाश टाकला.

भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून'स्वेरीयन'या त्रैमासिकाचे तसेच स्वेरी अंतर्गत असलेल्या चारही महाविद्यालयांतील विविध विभागांच्या न्यूज बुलेटीन्सचे प्रकाशन यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे,स्वेरीचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम.पवार,बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार,डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ,डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.एस.व्ही. मांडवे,सर्व अधिष्ठाता,सर्व विभागप्रमुख,सर्व प्राध्यापक वर्ग,रजिस्ट्रार राजेंद्र झरकर तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह स्वेरी अंतर्गत असलेल्या अभियांत्रिकी व फार्मसीचे विद्यार्थी,पालक वर्ग उपस्थित होते. साक्षी शिंदे, स्नेहा पिसे व प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी सुत्रसंचालन केले तर मिठाई वाटपाने या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# सावरकर विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा



**दैनिक यशसिद्धी न्युज**

निफाड/प्रतिनिधी :मराठा विद्या प्रसारक समाज संचलित सावरकर विद्यालय कोठुरे येथे देशाचा ७८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक सानप एस डी यांनी केले, त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील विविध स्वातंत्र्य सेनानींच्या यशोगाथा विद्यार्थ्यांसमोर मांडल्या. राष्ट्रीय ध्वजाचे ध्वजपूजन व ध्वजारोहण शालेय समितीचे जेष्ठ सदस्य बाळकृष्ण मोगल यांच्या हस्ते करण्यात आले.स्काऊट गाईड ध्वजाचे ध्वजारोहण शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य जितेंद्र पोटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यालयाच्या गीतमंचाने राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व ध्वजगीत ..सादर करून मान्यवरांची मने जिंकली. यावेळी कोठुरे येथील सुदर्शन दिलीप कोरडे यांनी सीए परीक्षेत यश संपादन केल्याबद्दल शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यालयातील एम सी सी च्या विद्यार्थ्यांनी संचलन विद्यालयातील क्रीडा शिक्षक संजय गायखे यांचे मार्गदर्शनाखाली सादर केले, या प्रसंगी सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले, असून ग्रामस्थांनी विविध कार्यक्रमांना प्रोत्साहन पर बक्षिसे विद्यार्थ्यांना दिली. कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षक-पालक संघ, माता पालक संघ , अध्यक्ष व सदस्य तसेच कोठुरेतील ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण भडांगे यांनी केले.

# शेतकऱ्यांच्या पिक संरक्षण औजारे योजनेची २० ऑगस्ट रोजी लॉटरी पध्दतीने सोडत

**दैनिक यशसिद्धी न्युज**

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना कळविण्यात येते की जिल्हा परिषद सोलापूर सेस फंडातून पिक संरक्षण औजारे, उपकरणे (श्री पिस्टन स्प्रे पंप, नॅपसॅक बॅटरी ऑपरेटड स्प्रेपंप ,ब्रश कटर ,सोलार इन्सेक्ट ट्रॅप ) ट्रॅक्टर चलित औजारे (रोटाव्हेटर , पल्टी नांगर , रोटरी टिलर , विडर ,पेरणी यंत्र, कल्टी व्हेटर ) कृषी सिंचनासाठी सुधारित औजारे साधने पुरविणे ( ५ एचपी सबमर्सिबल पंप संच. डिझल इंजिन) कृषी सिंचनासाठी सुधारित औजारे पुरविणे ( कडबाकुट्टी, ताडपत्री स्लरी, फिल्टर) ५० टक्के मर्यादित अनुदानावर उद्दढ तत्वावर देण्यात येणार आहे. वरील औजरासाठी शेतकऱ्यांना पंचायत समिती स्तरावर अर्ज करण्यासाठी दि . ५ ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानुसार दि. २० ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १० .३० वा. मा . मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. सोलापूर व अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. सोलापूर यांचे उपस्थित सदर औजारांसाठी बाबनिहाय लक्षांकानुसार लॉटर पध्दतीने शाळकरी मुलांकडून लाभार्थ्यांची निवड चिठ्ठी काढण्यात येणार आहे. तरी शेतकऱ्यांनी दि. २० ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १०.३० वा. उपस्थित राहावे असे आवाहन कृषी विकास अधिकारी व अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांनी केले आहे.

